# **विषयः-** महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, 1966 कलम 53, 54 ची कार्यपध्दती

( म.ज.म.सं (दुसरी सुधारणा ) अधिनियम, 2012 अन्वये सुधारीत )

**-: सादरकर्ता :-**

**नरेन्द्र गोपीनाथ चांदेवार**

**सहायक वनसंरक्षक, जंकास-2**

**नागपूर वनविभाग,नागपूर**

# वनजमीनीवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी वन अधिकाऱ्यांना महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 मधील अधिकार प्रदान करण्याबाबत.........

- ❖महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक पी.डब्ल्यू.आर 1996 /प्रकरण क्रमांक. 296 / प्रकरण क्रमांक.17 / ल - 2 **दिनांक- 18 जानेवारी 1997** नूसार

- ❖महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 मधील कलमे 53,54 व 54 अ या खालील जिल्हाधिकारी यांचे अधिकारांचा वापर महाराष्ट्र शासन वन विभाग चे,

1 सहाययक वनसंरक्षक

2 उपविभागीय वन अधिकारी आणि

3 उपवनसंरक्षक यांना त्यांचे अधिकारीतेतील शासनाची

( अ ) राखीव वने *

( ब ) संरक्षीत वने

( क ) त्यांच्या ताब्यातील अन्य जमीनीच्या संबंधात करावयाचे अधिकार देण्यात आले आहे.

- **राखीव वने** :- महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग -8 क्रमांक-55, दिनांक-2 जुन 2015

भारतीय वन अधिनियम 1927 ( महाराष्ट्र सुधारणा 2015 ) नूसार राखीव वनासंबंधी अतिक्रमण हटविण्याचे अधिकार वनाधिकारी यांना प्राप्त झाले.

महत्वाचे कलम ( अधिसुचना 2 जुन 2015 मधील )

26 ( 5 ) - पोट कलम ( 1 - A ) द्वारे तरतुद केलेल्या कोणत्याही प्रकरणात दिवाणी न्यायालयाला कोणतीही अधिकारिता राहणार नाही.

26 ( 4 ) - सहा वर्षापर्यंत मुदतीची कारावास व एक हजार इतके द्रव्यदंडाची शिक्षा

66 ( A ) - अपप्रेरणा

- राखीव वनावरील अतिक्रमण निर्मुलन करताना 2 जुन 2015 अधिसुचनाचाच वापर करावे.

# महाराष्ट्र जमीन महसुल संहीता, 1966

❖ जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार प्राधिकृत वनअधिकारी यांना दिलेले असल्याने जिल्हाधिकारी या शब्दाचे ठिकाणी प्राधीकृत अधिकारी असे समजून कार्यवाही करावी.

**कलम - 53 -** शासनाकडे विहित असलेल्या जमीनीचा अनधिकृतपणे भोगवटा करणाऱ्या व्यकितस संरक्षितरित्या चौकशी करुन निष्कासित करणे.

( 1 ) जर जिल्हाधिकारी यांचे मते

- एखादी व्यक्ती शासनाकडे विहीत असलेल्या कोणत्याही जमीनीचा अनधिकृतपणे भोगवटा करीत असेल,
- ती जमीन / तो प्रदेश तिच्या गैरकब्जात असेल,
- पटटयाची / कुळवहीवाटीची मुदत संपल्याच्या / समाप्त केल्याचा,
- सत्ता प्रकारासंबधी घालण्यात आलेल्या शर्तीचे उल्लघन केल्याच्या कारणावरुन भोगवटा / कब्जा करण्याचे चालु ठेवण्याचा तिला हक्क नसेल / हक्क असण्याचे बंद झाले तर,

( 1 अ ) उक्त व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल आणि आवश्यक वाटल्यास तो संक्षिप्त चौकशी करील.

- कलम 53 ( 1 ) अन्वये आपले मत बनविण्या संबंधीची कारणे अभिलिखीत करणे

( 2 ) आपल्या निष्कर्षाच्या आधारे,

- नोटीस मिळाल्यानंतर, वाजवी मुदत, यथास्थिती जमीन / प्रदेश रिकामा करण्यासाठी नोटिस बजाविल. पालन न केल्यास अशा जमीनी वरुन / प्रदेशावरुन अशा व्यक्तीस काढुन टाकता येईल

( 3 ) महसुल आकारणी अशा जमीनीच्या कर आकारणीच्या किवां भाडयाच्या दुपटीपेक्षा अधिक होणार नाही इतकी रक्कम भरण्यास पात्र असेल.

A ) नोटीस देणे- दिलेल्या मुदतीचे आत त्यांनी अतिक्रमण किवा अवैधरित्या कब्जा केलेली जागा खाली करुन देण्याबदल प्रथम कळवावे लागते

( भवानी शंकर वि. तालुकदारी सेटलमेंट ऑफिसर, 16 बाम्बे लॉ रि . 766 )

B) अशी नोटीस सदर इसमास काढुन लावण्याचा हुकुम समजला जातो.

(सेक्रेटरी ऑफ स्टेट वि. चिमणलाल जमनादाय, 44 बाम्बे लॉ रि. 295, 305 )

C) नोटीशीनंतर तो न गेल्यास नोटीशीची मुदत संपल्यानंतर त्यास सदर जमीनीवरुन काढुन लावता येते. त्याने काही बांधकाम केले असल्यास तेही काढुन टाकता येते.

(स्टेट ऑफ बाम्बे वि- फकीर उमार, 63 बॉम्बे लॉ रि. 624, 627 सुप्रीम कोर्ट )

D) अशा इसमाने सरकारी नोकरास त्याबाबतीत हरकत केल्यास तो **IPC , 1860** , कलम 183, 186 खाली खुन्हा ठरतो.

**कलम - 54** - संक्षिप्तरित्या चौकशी करुन निष्कासित केल्यानंतर असलेली मालमत्ता सरकार जमा करणे आणि ती काढुन टाकणे.

(1) संक्षिप्त चौकशी करुन कोणत्याही व्यक्तिस काढुन टाकल्यानंतरअशा जमीनीवर उभारलेली कोणतीही इमारत / बांधकामे / कोणतेही पीक, सरकारजमा केले जाण्यास पात्र होईल.

(2) सरकारजमा करण्याबाबतचा न्यायनिर्णय, जिल्हाधिकाऱ्याकडुन देण्यात येईल, विनियोगाचे निर्देश देईल.

- कोणतीही मालमता काढुन नेण्यासाठी आलेला खर्च जमीन महसुलांची थकबाकी म्हणून वसुल करता येईल

• **भारतीय वन कायदा 1927 चे कलम - 82-**

- शासनाला येणे असलेली रक्कम वसुल करणे - ती जमीन महसूल थकबाकी होती, त्याप्रमाणे अमलात असलेल्या कायदयाखाली वसुल करण्यात येईल.

- Revenue Recovery Cases ( RRC)

( A ) **IFA, 1927** चे **कलम - 82** - वन विभाग

( B ) **MLRC, 1966** चे **कलम - 221** - प्रस्ताव वन विभाग सादर करेल, कार्यवाही महसुल विभाग करेल.

- मालमत्ता काढुन टाकावी असा हूकुम असला तर तो काढुन नेण्याचा दोषी इसमाला हक्क असतो त्याने उभे पिक किंवा बांधकाम नोटीशीचे मुदतीत न काढुन नेल्यास ते सरकार काढुन टाकिल व त्याची विक्री करील. विक्रीचे रक्कमेतून खर्च वजा जमा वाढीची रक्कम त्या इसमास मिळेल. तुट आल्यास त्यांचेकडुन जमीन महसूल थकबाकी म्हणून **कलम 221** खाली ती वसुल केली जाईल.

**<u>कलम - 54 (अ)</u>** - दिनांक 1 डिसेंबर 1978 पासुन हे कलम अंमलात असणे बंद झाले आहे.

# महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 चे प्रकरण - बारा
# महसूल अधिकाऱ्यांची कार्यपध्दती

**कलम - 227** - पुरावा देण्यासाठी व दस्तेऐवज सादर करण्यासाठी व्यक्तीवर समन्स बजावण्याचा अधिकार.
( CPC, 1908 ( 1908 चा क्रमांक. 5) ची कलम 132 आणि 133 )

**कलम - 228** - समन्से लेखी, **सही** केलेली व **मुद्रा** असलेली असणे
**समन्साची बजावणी**-

- दर्शनी भागात चिपकविणे - घरी नसल्यास / पत्ता नसल्यास

- पोस्टाने - पोस्टाचा दाखला

**कलम - 229** - साक्षीदारास उपस्थित राहण्यास भाग पाडणे -

**कलम - 230** - नोटीस बजावण्याची रित -

- त्या व्याक्तिस
- प्राधिकृत अभिकर्त्यास
- पोस्टाने
- त्या व्यक्तिच्या राहण्याच्या जागी - शेवटचा पत्ता
- सार्वजनिक ठिकाणी, कोणत्याही जागी उक्त प्रत चिकटवून
- नावामध्ये /जमीनीच्या वर्णनात चुक झाली असल्यास पण त्या चूकामुळे अन्याय झाला नसेल, तर निरर्थक मानण्यात येणार नाही.

**कलम - 231** - साक्षीदाराना हजर करण्याविषयी कार्यपध्दती.

**कलम - 232** - पक्षकाराच्या अनुपस्थितीत सुनावणी करणे.

( एकतर्फी निकाल - 1) तो रदद करावा म्हणून अर्ज करता येते
2) अपीलही करता येते. )

- निकालाच्या दिनांकापासून **30** दिवसात अर्ज करणे

**कलम - 233** - सुनावणी स्थगित करणे

- लेखी कारणे,
- नविन सुनावणीचा दिनांक व जागा,

**कलम -234** - रीतसर चौकशी पुरावा घेण्याची रीत -

- पुराव्यांची नोंद, संपुर्णपणे लेखी, मराठी मध्ये
- ज्ञापन तयार करणे, इंग्रजी पुरावा - भांषातर मराठी मध्ये

**कलम - 235** - निर्णय लिहणे व त्यांचे स्पष्टीकरण

**कलम - 236** - **संक्षिप्त चौकशी कशी करावी ( कलम - 53 पहा )**

- मुद्दे, त्या गोष्टी, पुराव्यातील मुख्य भाग, निर्णय, व त्याबददलची कारणे.
- पक्षकाराना मुखत्यार किंवा वकिलामार्फत हजर होता येते ( परवानगी )

-= अधिकाऱ्यास वाटल्यास किंवा एखादे प्रकरणाचे कामी संक्षिप्त चौकशी ऐवजी रितसर चौकशी करता येते.

**कलम - 237** - रितसर व संक्षिप्तचौकशी न्यायीक कार्यवाही समजावे

- **IPC,1860** ची **कलम 193, 219, 228** च्या अर्थानूसार न्यायीक कार्यवाही म्हणून मानन्यात येईल.
- अशी चौकशी करणारे प्राधिकाऱ्याचे **कार्यालय दिवाणी न्यायालय** आहे असे मानन्यात येईल.

# चौकशीचे प्रकार ( 3 )

**1) रितसर चौकशी** - मध्य प्रदेश जमीन महसुल अधिनियम, 1954

मुंबई ,1987 व हैदराबाद, 1317

- सर्वात श्रेष्ठ .
- न्यायालयीन चौकशी.
- जबानी मराठीतुन.
- मुद्दे, त्याचा निर्णय, कारणे नमुद केली पाहीजे.
- सर्वांना खुली, सर्वांना हजर राहता येते.
- लेखी व तोंडी पुरावा.
- पक्षकाराना मुखत्यार / वकिला मार्फत हजर राहता येते.

**2) संक्षिप्त चौकशी** - मुंबई व हैदराबाद स्टेट.

- रितसर नंतर संक्षिप्त श्रेष्ठ.
- न्यायालयीन चौकशी
- त्रोटक, टिप्पणी नमुद करणे.
- निकालपत्र निर्णयाची कारणे देणे.
- निकालपत्र सविस्त्र नसणे
- संक्षिप्चौकशी - रितसर मध्ये बदल करता येणे.

**3) सामान्य चौकशी** - मुंबई व हैदराबाद स्टेट.

- संक्षीप्त नंतर महत्त्वाची कनिष्ठ
- सामन्य चौकशीचे काम नियमात दिलेल्या पध्दतीने केले पाहिजे.
- समन्स फक्त प्राधिकृत अधिकारीच काढुन शकतो.
- नैसर्गिक न्याय तत्व लावता येत नाही.
- कारभाराविषयक किंवा अमंलबजावणी विषयक असते **( कलम 238 )**

# MLRC , 1966, प्रकरण - तेरा

## अपिले, पुनरीक्षण व पुनर्विलोकन

**कलम - 247** - अपील व अपील प्राधिकारी

- अपीलाची संख्या दोन पेक्षा जास्त होणार नाही.

= अनूसुची " **इ** "

- **60** दिवसाचे आत

**कलम - 248** - राज्य शासनाकडे अपील केव्हा करावे

- **90** दिवसाचे आत

( शनिवार व रविवार / शासकीय सुटटी येत असेल तर नंतरचा दिवस अंतीम )

# अनुसुची " इ " ( कलम - 247 )

**महसुल अधिकारी** | **अपील अधिकारी**

( 3 ) जिल्हाधिकारी ( सहायक वनसंरक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी) —— ( 3 ) विभागीय आयुक्त

**( 60 दिवस )**
**(प्रथम अपील)**

**विभागीय आयुक्त** —— राज्य शासन

**( 90 दिवस )**
**(द्वितीय अपील अंतीम)**

| | | |
|---|---|---|
| सन 1876 अधिनियम क्रमांक 10 | मुंबई महसुल क्षेत्राधिकार अधिनियम 1876 **Bombay Revenue Jouridiction Act - 1876** | कलम 11 मधील "कोणत्याही दिवाणी न्यायालयीन " या मजकुराऐवजी" महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 मध्ये अन्यथा स्पष्टपणे तरतुद करण्यात आली असेल त्याशिवाय कोणत्याही " दिवाणी न्यायालयाने " हा मजकुर दाखल करण्यात येईल |

**कलम - 11 -** कार्यवाही सुरु असताना कोर्टत / अपील प्रतिदावा करु शकत नाही

**Section-11- Suit not to be entertained unless plaintiff has exhausted right of appeal**

# क्रम ( Flow Chart )

1) **POR** नोंदविणे, अभिलेख तयार करणे ( कार्यवाहीची सर्व कागदपत्रे /**Case Paper**)

2) हकिकत नामा / **Case diary** मध्ये RO ने RFO कडे सादर केल्याचे नमुद करणे. RFO ने Case diary मध्ये ACF कडे कलम 53 व 54 च्या तरतुदी आदेशाकरीता सादर करणे.

RFO ने Case Paper सह प्रतिवेदन मध्ये नमुद करुन प्रकरणासह अतिक्रमण निर्मुलन संबंधी न्यायालयाचे निर्णय समाविष्ठ करणे.

3) **Check list** - सखोल तपासणी - RFO स्तरावर

4) **ACF** - स्तरावर पुन्हा तपासणी - त्रुटया असल्यास परत

5) **Notice -** वाजवी संधी

6) पुरावा नोंदी, बयाण, टिप्पण , ज्ञापन

7) रोजनामा, सुनावणी रजीस्टर

8) चौकशी - संक्षिप्त / रितसर

9) आदेश

10) जाहिर वाचन

(Items 6–10: **Proceeding** (अतिक्रमण धारक विरुध्द वपअ))

11) प्रत - अतिक्रमण धारकास, RFO यांना देणे

# नमुना पत्रके

- POR
- सुनावणी रजीस्टर
- रोजनामा
- आदेश
- नोटीस
- चेकलिस्ट तपासणी